आरोपीच्या वकीलांनी नि.क्र.२७ कडे अर्ज देऊन आरोपी क्र.१ व २ च्या गैरहजरीत प्रकरण चालवण्याची विनंती केली. सदरचा अर्ज आरोपीची क्र.१ व २ ची ओळख भविष्यात आव्हानीत करणार नाही या अटीवर मंजुर करण्यात आली.

**दोषारोप निश्चीती पुर्वीचा पुरावा**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – ज्ञानेश्वर पंडीतराव वाडीकर,

वय – ४५ वर्षे, व्यवसाय– शेती,

पत्ता – साकोळ ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर.

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास वकील श्री. एस.के.कस्तुरे यांचे मार्फत सुरुः–**

मी फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. आरोपी अजिंक्य अरविंद सोनवणे याचे आडतचे दुकान आहे व आरोपी क्र.२ उमाकांत तुकाराम गंभीरे हे मुनीम आहेत. माझा तेथे शेतातील माल जसे की, हरभरा व तुर जात असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. फिर्यादी यशवंत राणाप्रताप पाटील व मी दोघे मिळून माल घालायला गेलो होतो. ते म्हणाले माल घ्या, काही तरी भांडवल गुंतवा. त्यामुळे आम्ही भांडवल गुंतवलो. फिर्यादीने २९,१५,०००/– भांडवले गुंतवले. फिर्यादीने दाम दुपटीकरीता भांडवल गुंतवले. नंतर त्यांनी फायदा दिले नाही, फसवणुक केले. एकुण फायदा करुन ७०–८० लाख देतो असे म्हणाले होते. त्याबद्दल २४,४०,०००/– दिलेले आहेत. बाकीची रक्कम दिली नाही, पुन्हा ४–५ वर्षानी शिरुर अनंतपाळच्या बस स्टॅन्डसमोर भेटले होते. त्यावेळी दोघांची धक्काबुक्की झाली, शिवीगाळ केले. मी व शरद शेषेराव शिंदे यांनी सोडवासोडव केली. पैसे देताना मी, फिर्यादी, शरद शिंदे, मुनीम गंभीरे व आरोपी क्र.१ हे होते. पैसे देण्याबाबत लिखापडी झालेली आहे. एकावेळी ३,५०,०००/– व दुसऱ्यावेळी ५,५०,०००/– लिहून घेऊन दिलेले आहेत.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ एस.एस.मादलापुरे यांनी दोषारोप निश्चीतीपर्यंत राखून ठेवला.**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.04.16 17:55:30 +0530

**(श्रीमती.के.पी.गाडे)**

दिनांक १६/०४/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, निलंगा